उप आयुक्त (अतिक्रमण) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.ई./ ७०६
दिनांक :- १६/०८/२०१४

कार्यालयीन आदेश

मा. महापालिका सहाय्यक आयुक्त,
सर्व महा.सहा.आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका,

यांजकडेस.....

**विषय** :- सार्वजनिक गणेशोत्सव सन २०१४ करीता महानगरपालिकेच्या रस्त्यांवर उभारण्यात येणा-या मंडपांना परवानगी देणेबाबत कार्यवाही महा.सहा.आयुक्त कार्यालयाकडून करणेबाबत...

**संदर्भ** :- मा. महापौर, पुणे महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १४/०८/२०१४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज सभाग.ह येथे दुपारी १.०० वा. सर्व संबंधीतांची झालेली बैठक

या वर्षीचा गणेशोत्स दिनांक २९/०८/२०१४ ते दिनांक ०८/०९/२०१४ या कालावधीत साजरा होणार आहे. पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये रस्त्यांवर सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्र उत्सव अशा धार्मिक, इतर सार्वजनिक कार्यक्रमासाठी तसेच वैयक्तीक कार्यक्रमासाठी मंडप / कमान घालण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३४ अन्वये मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही अधिका-यांच्या किंवा समक्ष प्राधिका-यांची लेखी संमती (ना-हरकत प्रमाणपत्र) हजर केल्यानंतरच अशी मागणी करणा-या संबंधित संस्था, मंडळ, अर्जदारास मंडप/ कमान घालण्यासाठी तात्पुरती परवानगी अतिक्रमण विभागाकडून दिली जाते. मा. मुख्य सभा ठराव क्र.१०५, दिनांक २३/०७/२००२ नुसार सार्वजनिकरित्या अशा साजरे केले जाणा-या उत्सवांकरिता उभारण्यात येणा-या मांडवासाठी परवाना फी व अनामत रक्कम न स्विकारता परवानगी देण्याची प्रचलित धोरणात तरतुद आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव सन २०१४ मध्ये म.न.पा. रस्त्यांवर गणेशोत्सवाकरिता मंडप / कमान टाकणेबाबत मागणी करणा-या संबंधित संस्था, मंडळे, नागरिक इत्यादी अर्जदारांना परवाने देणेकामी मा. महापौर, पुणे मनपा यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमधील निर्णयानुसार पुणे शहरातील प्रत्येक पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये **एक खिडकी योजना** राबविणेबाबत ठरविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने सर्व महा.सहा.आयुक्त कार्यालय यांचे कार्यकक्षेत येणा-या संबंधीत पोलीस स्टेशन येथे एक खिडकी योजने अंतर्गत गणेश उत्सवा करिता मांडव/कमान परवाने देणे कामी सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये नमुद केले नुसार संबंधित अतिक्रमण निरिक्षक /सहा.अतिक्रमण निरिक्षक यांनी त्यांना देण्यात येणा-या मदतीस दिलेल्या सेवकासह या कार्यालयीन आदेशाचे दिनांका पासुन संबंधित पोलीस स्टेशन मध्ये त्वरित संपर्क साधून वरिलनुसार कामकाज दि.३०/०८/२०१४ अखेर पर्यन्त करावयाचे आहे. सदर कामकाजा बाबत संबंधित पोलीस स्टेशन येथे आपले नियंत्रणाखालील संबंधित अतिक्रमण निरिक्षक/सहा.अतिक्रमण निरिक्षक यांना दि.१६/०८/२०१४ रोजी त्वरित संपर्क करणेस सांगून वरिल कामकाजा बाबत योग्य ते नियोजन व कामाच्या वेळा ठरवून घेणे बाबत आवश्यकत्या सूचना देण्यात याव्यात. सदर कामकाजावर सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी नियंत्रण ठेवून गणेश उत्सवाबाबतचे आवश्यक ते परवाने नियमानुसार व मुदतीत दिले जातील या बाबत दक्षता घ्यावी.

संबंधित पोलीस स्टेशन कडील /वाहतुक पोलीस विभागाकडील अटी/शर्ती व अतिक्रमण विभागाकडील खालील नमूद अटी /शर्तीनुसार मांडव /कमान परवाना मागणी अर्जांची तपासणी होऊन होवून मंडळाना वेळेत मंडप/कमान परवाने मुदतीत देण्याचे काम संबंधित अतिक्रमण निरीक्षक /सहा. निरीक्षक यांनी एक खिडकी योजने अंतर्गत त्यांचे हद्दीतील पोलीस स्टेशन मार्फत करावयाचे आहे. दिलेल्या परवान्याबाबतची माहिती सोबत दिलेल्या तक्त्यामध्ये भरण्यात येवुन त्या बाबतची आकडेवारी दररोज दुरध्वनीद्वारे मुख्य कार्यालयाकडे कळविण्यात यावी.

१) गणेशमंडळांनी रस्त्यात खड्डे न घेता गणेशोत्सवाचा मांडव बॉक्स / कमानी तसेच धावते मांडव इत्यादींच्या जोडलेल्या नमुन्यातील लेखी हमीपत्र संबंधितांकडुन भरुन घेण्यात यावी.
२) गणेशोत्सव कालावधीमध्ये मुख्य रहदारीचे रस्ते सोडुन इतर रस्त्यावर रहदारीस कुठलाही अडथळा निर्माण न करणा-याअटी /शर्तीनुसार व अतिक्रमण विभागकडील नियमांनुसार शुल्क आकारुन एका मंडळास जास्तीत जास्त दोन कमानी (पोलीस विभागाकडील निर्णया नुसार) उभारणेस परवानगी देण्यात यावी.
३) अक्षेपार्ह्य व अडथळा निर्माण करणा-या विनापरवाना कमानी संदर्भात संबंधित जाहिरात कंपनी व गणेश मंडळे या दोघांवर कायदेशिर कारवाई केली जाईल या बाबत संबंधितांना मांडव परवानगी देतानाच समज देण्यात यावी.
४) मंडप उभारणी संदर्भात मंडपाचा आकार , उंची, जमीनीपासुन उंची, मंडपाचे वरती व बाजुने असणारे सर्वांचा विचार करुन मांडव उभारणेस, तसेच गणेश विसर्जन झाले नंतर दोन दिवसाचे आत संबंधितांनी रस्त्यावरील देखावे, विटांमधील बांधकामे, देखाव्यातील मुर्ती व अन्य साहित्य रस्त्यावरुन ताबडतोब हलविणेत यावीत.या बाबतची समज संबंधितांना परवाना देताना देण्यात यावी.
५) सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत संबंधित अतिक्रमण निरीक्षक/सहा.निरीक्षक यांनी उपस्थित राहुन अर्ज तपासणी करुन १२ तासाचे आत अर्जावर कार्यवाही करणेत यावी.
६) मंडप उभारणी रस्त्यास समांतर व रस्त्याच्या १/३ भागात, तसेच वाहतुक पोलीस शाखेकडील ना हरकत पत्रात नमुद केलेल्या आकारमाना नुसार असलेबाबत खातरजमा करुनच परवानगी देण्यात यावी. या बाबत महापालीकेकडील प्रचलीत मांडव आकारा बाबतचा तक्ता माहितीसाठी खालील प्रमाणे दर्शविला आहे.
७)

| रस्त्याची रुंदी | मंडपासाठी दिली पाहिजे अशी कमाल रुंदी | मोकळी /खुली असली पाहिजे अशी रस्त्याची रुंदी |
|---|---|---|
| २५ फुट | १० फुट | १५ फुट |
| ५० फुट | १० फुट | ३० फुट |
| ७० फुट | ३० फुट | ४० फुट |

तरी सर्व संबंधित महापालीका सहा. आयुक्त यांनी आपले नियंत्रणा खालील अतिक्रमण निरीक्षक व सहा. अतिक्रमण निरीक्षक यांचे कडुन आपले कार्यक्षेत्रातील असणा-या सर्व पोलीस स्टेशऩ मार्फत वरिल प्रमाणे कार्यवाही करुन घेण्यात यावी ही विनंती.

**सोबत : —** १) हमीपत्राचा नमुना

२) एक खिडकी योजने अंतर्गत काम करणे करीता नेमलेल्या सेवकांचा पोलीस स्टेशन निहाय्य तक्ता.

**टिप :-** ज्या महापालीका सहा. आयुक्त कार्यालयाच्या हद्दीमध्ये एका पेक्षा जास्त पोलीस स्टेशन असतील अशा ठिकाणी संबंधित अतिक्रमण निरीक्षक / सहा. अतिक्रमण निरीक्षक यांनी त्यांचे

कार्यालय क्षेत्रातील सर्व पोलीस स्टेशन यांचेशी चर्चा करुन योग्य त्या वेळा ठरवुन एकत्रीत वरिलकामा संबंधी समन्वय ठेवायचा आहे, त्या करीता त्यांना मुख्य कार्यालया कडून ज्यादाच्या पोलीस स्टेशननुसार आवश्यकतेनुसार मदतनिस सेवकाची नेमणुक करण्यात येईल.

**प्रतः**

१) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका

२) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट्स), पुणे महानगरपालिका

३) मा. पोलीस उप आयुक्त (विशेष शाखा), पुणे शहर

४) मा. उप आयुक्त, वि.का.क्र.१ ते ४ पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहितीसाठी सविनय सादर...

१) मा. उप आयुक्त(तांत्रिक), परवाना व आकाशचिन्ह विभाग, पुणे महानगरपालिका

यांजकडेस...

कृपया आपले नियंत्रणा खालील परवाना व आकाशचिन्ह विभागाकडील संबंधित परवाना निरीक्षकांनी त्यांना नेमुन दिलेल्या महा. सहा. आयुक्त कार्यालय हद्दीमधील गणेशोत्सव कालावधी मधिल वेळवेगळ्या स्वरुपात लावल्या जाणा-या जाहिरातिंचे आपले क्रडील नियमानुसार परवाने देणे कामी वर नमुद कालावधी मध्ये एक खिडकी योजने अंतर्गत कामकाज करणे बाबत योग्य ते आदेश देण्यात यावेत ही विनंती.

दिनांक -        /        /२०१४

# हमिपत्र

आम्ही खाली सह्या करणारे -------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------
या मंडळाचे / संस्थेचे / संघटनेचे / कार्यालयाचे प्रमुख पदाधिकारी असुन सन २०१४ सालातील सार्वजनीक गणेशोत्सव साजरा करणे करीता पुणे महापालिकेकडुन म.न.पा. रस्त्यावर मंडप व कमानी टाकणे करीता आवश्यक ती परवानगी घेतली असुन सदर परवान्या मधिल सर्व अटी खालील नमुद केलेल्या अटी व शर्ती आम्हास मान्य असुन त्यांचे आम्ही काटेकोरपणे पालन करणार असले बाबत या हमिपत्राद्वारे पुणे महानगरपालिकेस लेखी हामि देत आहोत.

**अटी /शर्ती** –

१) आम्ही रस्त्यावर खड्डे न घेता मांडव, बॉक्स कमानी तसेच धावते मांडव इत्यादींच्या अधिकृत परवानगी घेवूनच उभारणे बाबत आम्हास परवाना देते वेळेस समज देण्यात आली असुन या अटींचे आम्ही पालन करु

२) गणेशोत्सव कालावधीमध्ये मुख्य रहदारीचे रस्ते सोडुन इतर रस्त्यावर रहदारीस कुठलाही अडथळा निर्माण होणार नाही अशा ठिकाणी मांडव व कमानी उभारणेत येतील व त्या बाबत स्थानिक पोलीस स्टेशन, **वाहतुक पोलीस विभाग यांचेकडुन कळविण्यात आलेल्या सर्व** अटी /शर्तीचे पालन करण्यात येईल.

३) अधिकृत कमानिवर अथवा धावत्या मांडवाचे झालरीवर म.न.पा. आकाशचिन्ह परवाना विभागाची परवानगी घेवुन जाहिराती लावल्या जातील, तसेच विनापरवाना अक्षेपार्ह्य व गणेशमंडळे या दोघावर कायदेशीर कारवाई केली जाईल. या बाबत आम्हास मांडव परवानगी देतानाच समज देण्यात आली असुन त्या बाबी आम्हास मान्य आहेत.

४) मंडप उभारणी संदर्भात मंडपाचा आकार, उंची, जमीनीपासुन उंची, मंडपाच्या वरती व बाजुने असणारे पत्रे या सर्वांचा विचार करुन मांडव टाकणेत येईल, तसेच **गणेशविसर्जन झाले नंतर २ दिवसाचे आत आमचे स्वखर्चाने** मंडप, रस्त्यावरील देखावे, विटांमधील बांधकामे, देखाव्यातील मुर्ती व अन्य साहित्य रस्त्यांवरुन ताबडतोब हटवुन घेऊ.

५) मंडप उभारणी रस्त्यास समांतर व रस्त्याच्या १/३भागात, तसेच वाहतुक पोलीस शाखेकडील ना हरकत पत्रात नमुद केलेल्या अटी /शर्ती नुसारच उभारणेत येईल.

वरील नमुद केलेल्या अटी व शर्ती आम्हास मान्य असुन सदर अटी व शर्तीचा आमचे कडुन गणेशोत्सव कालावधीमध्ये भंग झाल्यास महानगरपालिका आमचेवर जी कायदेशिर कार्यवाही करेल त्यास आम्ही कोणतीही हरकत घेणार नाही असे या **हमिपत्राद्वारे** लिहुन देत आहोत.

**खाली सह्या करणारे मंडळाचे /संस्थेचे /संघटनेचे / कार्यालयाचे प्रमुख पदाधिकारी**

| | नांव | पदाचे नांव | स्वाक्षरी | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|---|
| १) | ------------------------------------- | ---------------- | ------------- | ---------------- |
| २) | ------------------------------------- | ---------------- | ------------- | ---------------- |
| ३) | ------------------------------------- | ---------------- | ------------- | ---------------- |

उप आयुक्त (अतिक्रमण)कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :

**गणेश उत्सव सन – २०१४**

सार्वजनीक गणेश उत्सव सन २०१४ करीता महानगरपालिकेच्या रस्त्यावर उभारण्यात येणा-या मंडपांना परवानगी देणे बाबतची कार्यवाही महा.सहा.आयुक्त कार्यालया कडुन करणे बाबत एक खिडकी योजने अंतर्गत काम

**करणेकरिता नेमलेल्या सेवकांचा पोलीस स्टेशन निहाय तक्ता.**

| अ.नं | महा.सहा.आयुक्त कार्यालय | पोलीस स्टेशन | अतिक्रमण निरीक्षक/सहा.अतिक्रमण निरीक्षक |
|---|---|---|---|
| **उप आयुक्त, विभागीय कार्यालय क्रमांक १** | | | |
| १ | औंध | १) चतुश्रृंगी पो.स्टेशन<br>२) खडकी पो.स्टेशन | श्री. उतळे सचिन मो.: ९६८९९३१६७९ |
| २ | कोथरुड | १) कोथरुड पो.स्टेशन | श्री. खुडे राजेश मो.:९६८९९३१६४१ |
| ३ | वारजे-कर्वेनगर | १) वारजे पो.स्टेशन | श्री. जगताप सुभाष मो.: ९६८९९३१५४८ |
| ४ | घोले रोड | १) शिवाजीनगर पो.स्टेशन<br>२) डेक्कन पो.स्टेशन<br>३) चतुश्रृंगी पो.स्टेशन | श्री. ढोकले दगडू मो. ९६८९९३१८९२ |
| **उप आयुक्त, विभागीय कार्यालय क्रमांक २** | | | |
| १ | कै.बा.स.ढोले पाटील रोड | १) बंडगार्डन पो.स्टेशन<br>२) मुंढवा पो.स्टेशन<br>३) कोरेगांवपार्क पो.स्टेशन | श्री.साबळे नारायण मो.९६८९९३१२०१ |
| २ | नगररोड (वडगांवशेरी ) | १) येरवडा पो.स्टेशन<br>२) विमानतळ पो.स्टेशन | श्री. भिमाजी शिंदे मो.९६८९९१०१०७ |
| ३ | येरवडा (संगमवाडी) | १) विश्रांतवाडी पो.स्टेशन<br>२) येरवडा पो.स्टेशन | श्री. लोंढे राजु मो. ८३०८४१०४१० |
| **उप आयुक्त, विभागीय कार्यालय क्रमांक ३** | | | |
| १ | विश्रामबागवाडा | १) फरासखाना पो.स्टेशन<br>२) विश्रामबाग पो.स्टेशन<br>३) खडक पो.स्टेशन | श्री. कुंभार संजय मो. ९६८९९३१९८९ |
| २ | भवानीपेठ | १) समर्थ पो.स्टेशन<br>२) खडक पो.स्टेशन | श्री. नेवसे धनंजय मो. ९६८९९३१६५८<br>श्री. गायकवाड धम्मानंद मो.७७२२००७५८५ |
| ३ | सहकारनगर | १) सहकारनगर पो.स्टेशन<br>२) बिबवेवाडी पो.स्टेशन<br>३) स्वारगेट पो.स्टेशन | श्री. शशिकांत टाक मो.७७२२००४७७५ |
| ४ | टिळकरोड | १) दत्तवाडी पो. स्टेशन<br>२) अभिरुची पो.स्टेशन | श्री. सोनार श्रीकृष्ण मो.९६८९९३१६५९ |
| **उप आयुक्त, विभागीय कार्यालय क्रमांक ४** | | | |
| १ | हडपसर | १) हडपसर पो.स्टेशन | श्री. तारु गणेश मो.९६८९९३१६६९ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | बिबवेवाडी | १) बिबवेवाडी पो.स्टेशन<br>२) मार्केटयार्ड पो.स्टेशन | श्री. अवघडे श्याम मो.९६८९९३१६८६ |
| ३ | धनकवडी | १) भारतीविद्यापीठ पो.स्टेशन<br>२) सहकारनगर पो.स्टेशन | श्री. धरपाळे अविनाश मो.९६८९९१७१७६ |
| ४ | कोंढवा - वानवडी | १) वानवडी पो.स्टेशन<br>२) कोंढवा पो.स्टेशन | श्री. जाधव संजय मो. ९६८९९३१४३९ |